
# Tactful Management

ISSN: 2319-7943 Impact Factor : 2.1632(UIF) Volume - 4 | Issue - 6 | March - 2016


## "प्रतित्यसमुत्पादसिद्धांत"





संदेश वाघ

सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग, मुंबई विद्यापीठ.


### 1.प्रस्तावना :

।। नमो तस्स भगवतो अरहतो सम्मासम्बुद्धस्स ।।

२५५६ बुद्धप्ब्द वर्षापूर्वी तथागत गौतम बुद्धांनी प्राप्त केलेली संबोधी ही ही आषाढ पौर्णिमा दिनी सारनाथ येथील ऋषीपतन मृगदायवनात पंचवग्गिय भिक्खुसंधासह पहिले धम्मच्चक्कपवत्तनाय सुत्त स्वरूपात जगाला प्रकाशीत केली.

तथागत भगवान गौतम बुद्धांचे तत्वज्ञान हे संसारातील मानव सत्वांच्या संपूर्ण दुःखावर मात करणारा एक वैानिक सिद्धांत म्हणून जगभरात प्रसिद्ध आहे. बौद्ध धम्मातील काही प्रमुख मुळ प्रभावी सिद्धांतापैकी प्रतित्यसमुप्ताद हा एक मूळ आणि प्रभावशाली सिद्धांत आहे.

प्रतित्यसमुत्पादावर पूढील सर्वच प्रकारचे बुद्धत्वज्ञान आधारीत आहे. संपूर्णबुद्ध त्वज्ञानाचा पाया हा समुत्पाद सिद्धांतातील तत्वज्ञानात अभ्यासावयास मिळते.

तथागत भगवान बुद्धांचे संपूर्ण बुद्ध तत्वज्ञान हे एक विज्ञान आहे. या विज्ञानाच्या कसोटीस पूर्णत्वास नेण्यास आधारभुत ठरणाऱ्या मुळ बुद्धसिद्धांतापैकी प्रतित्यसमुत्पाद सिद्धांत हा एक प्रमुख सिद्धांत आहे.

अनित्यता दुःख अनात्मता आणि निर्वाण (निब्बाण) हे चारही सिद्धांत प्रतित्यसमुत्पादावर आधारित आहेत. त्यांचा उगमच मुळात प्रतित्यसमुत्यादातुन झाला आहे. आणि म्हणुन भगवान बुद्ध म्हणतात. बौद्ध तत्वज्ञान यथार्थ स्वरूपात समजून घेण्यासाठी प्रतित्य समुत्पादास जाणुन घेणे आवश्यक आहे.

### *2) प्रतित्यसमुत्पाद स्वरूप :*

प्रतित्यसमुत्वादाचे महत्व विषद करतांना बुद्ध सांगतात ''जो प्रतित्यसमुत्पादास जाणतो तो धम्माला जानतो जो धम्माला जानतो तो प्रतित्यसमुत्पादास जानतो''

'' यो पटिच्चसमुप्पादं वस्सति सो धम्मं वस्सति।''
''यो धम्मं पस्सति सो परिच्च समुप्पादं पस्सति।''
यो भिक्षवः पतित्यसमुत्पादं पश्यति, स धम्मं पश्यति।
यो धम्मं पश्यति स बुद्धं पश्मति ।।''

वरील पालि गाथेचा अर्भ समजून घेतानां आपल्या लक्षात येते की, भगवान तथागतांनी प्रतित्यसमूत्पाद सिद्धांतास संपूर्ण 'धम्मा' चे स्विवरूप म्हणून विषद केले आहे. महवग्गात म्हटल्याप्रमाणे भगवान बुद्धांना सम्यक सम्बोधिच्या वेळीच प्रतित्यसमुत्पादाच्या सिद्धांताचा साक्षात्कार झाला होता. बुद्धत्व प्राप्तीनंतर आठवडाभर एकाच आसणात आसणस्त होवून संबोधिच्या साक्षात्काराणे प्राप्त झालेल्या विमुक्तीच्या सुग्वाचा अनुभ होत असता भगवान बुद्धांनी त्या रात्रीच्या प्रथम यामात प्रतित्य समुत्पाद अर्थात कार्यकारण भाव सिद्धांताचे अनुलोम (उतरत्या क्रमाणे) प्रतिलोम (चढत्या क्रमाणे) अनुभव होत बुद्धांनी म्हटले....

इमस्मि सति इदं होति!
इमरूसुप्पादा इदं उपज्जति।।
इमस्मि असति इदं न होति।
इमस्म निरोधा इदं निरूज्जति।।

अर्थः हयाच्या होण्यामुळे हे होत असते, हयाच्या न होण्यामुळे हे हो नसते. हयाच्या उत्पन्न होण्यामुळे हे उत्पन्न होत असते, हयाचा निरोध (नष्ट) केल्याणे हयाचा निरोध होत असतो.

वरील धम्मपालि गाथेवरून आपल्या लक्षात येत की, 'प्रतित्यसमुत्पादास' 'कार्यकारनभाव' सिद्धांत असे का म्हणतात.

मानवाच्या आयुष्यात व निसर्गात आयुष्यात घडत अलेल्या घडून गेलेल्या व भविष्यात घडणाऱ्या प्रत्येक घटनेस काहीना काही कारण आहे. कारणाशिवाय कोणतेही कारण घडत नाही. वरील गाथेच्या आधारे समजून घेतांना आपल्या लक्षात येते की, प्रतित्यसमुत्पाद या मुळ सिद्धांताचे अनुलोम व प्रतिलोम स्वरूपात मनन केले. प्रतित्यसमुत्पाद सिद्धांत मानवाच्या जन्म आणि मृत्युच्या संदर्भात विषद केलेले अत्यंत गंभीर बुद्धतत्वज्ञान आहे. याच प्रतित्यसमुत्पाद सिद्धांताप्रती तथागत बुद्धांनी पूढील उदान काढले. ''जेव्हा क्षीणास्त्र व तपस्वीच्या पुढे धम्म प्रकट होत असतो, तेव्हा त्याच्या सर्व शंका मुळापासुन नष्ट होत असतात; कारण की, तो हेतुसहित धम्माला जाणत असतो,,

ऋषीपतन मृगदायवनात स्विकारलेला बुद्धांचा पहिला बुद्धोपदेश पंचवग्गिय भिक्खु संघानी मोटया ऋद्धापूर्वक भावने श्रवण केला व श्रवण केलेल्या संपूर्ण बुद्धोपदेशाचे ऋद्धापूर्वक तन-मन व धनपूर्वक होवून आचरणात आनले. आचरणात अनुभव घेतलेल्या - धम्माचा प्रचार-प्रसार करतांना वंदनिय भन्ते आश्वजीत यांनी पुढील शब्दांत संक्षेपाने धम्म सांगितला.....

ये धम्मा हेतुप्पभवा, हेतुं तेसं तथागतो आह।
तेसंज यो निरोधो, एवं वादी महासमणो।।

जी दुःखे, ज्या गोष्टी (धम्म) कारणांपासून उत्पन्न होतात, त्यांची कारणे तथागतांनी सांगितले आहेत आणि त्यांचा निरोध कसा करावा हे त्यांनी सांगितले आहे. हेच महश्रमणांचे (तथागत) अधिकृत मत आहे.

वरील गाथेचा आधार घेवून आपल्याला विषद करता येते की, अगदी सुरूवातीपासूनच बुद्ध तत्वज्ञानाचा पाया प्रतित्यसमुत्पादाच्या सिद्धांतावर अवलंबून आहे.

भगवान बुद्ध प्रतित्यसमुत्पाद सिद्धांतावर उपदेश करतांना वरील सिद्धांताचा उपदेश करतांना बुद्ध म्हणतात हा सरळ व नैसर्गिक तत्वज्ञानाच्या तथ्यानी संपूर्ण असलेला सिद्धांत आहे.

### *3) प्रतित्यसमुत्पाद सिद्धांताचेः*

बुद्धत्व प्राप्त करण्यापूर्वी बोधिसत्व अवस्थेत असतांना बुद्धत्व समजून घेतांना दुःखाच्या प्रश्नावर आपले लक्ष केंद्रित करीत बोधिवृक्षाखाली बसून ध्याण करीत असतांना त्यांना आतापर्यंत कधीही न ऐकलेले व कधिही न अनुभवलेल्या प्रतित्य समुत्पाद सिद्धांताचा शोध लागला.

मानवाच्या जीवनात दुःख कसे उत्पन्न होते. उत्पन्न झालेल्या दुःखाचे कारणे काय आहेत? दुःखाचा निरोध कसा करता येतो व त्या दुःखास नष्ट (मुक्त) करून सर्व बंधन मुक्त होण्यासाठी आवश्यक मार्ग या प्रतित्यसमुत्पाद सिद्धांताचा शोधातून प्राप्त झाले.

संयुक्त निकायातील गौतम सुत्तात भगवान बुद्ध म्हणतात, '' भिक्खुनो समुदय, समुदय असा मला पूर्वी कधी न ऐकलेला धम्मचक्खु माझ्यात उत्पन्न झाले. ज्ञान उत्पन्न झाले, प्रज्ञा उत्पन्न झाली, विद्या उत्पन्न झाली आलोक उत्पन्न झाला.... भिक्खुनो, निरोध - निारोध असा मला पूर्वी कधी न ऐकले गेलेल्या धम्मात... श्रेष्ठ पज्जा चक्षु उत्पन्न झाले, ज्ञान उत्पन्न झाले. प्रज्ञा प्राप्त

झाली, अलोक उत्पन्न झाला.''

प्रतित्यसमुत्पाद सिद्धांताच्या साक्षात्काराने भगवान बुद्धास चार आर्यसत्याचा साक्षात्कार करणे शक्य झाले. भगवान बुद्ध सांगताता. चार आर्य सत्याचा मुळ तत्वज्ञगाभा प्रतित्यसमुत्पाद सिद्धांतात दिसून येतो. प्रतित्यसमुत्पाद सिद्धांता भगवान बुद्धांनी दुःखाच्या कारणांचा जन्म हा कसा अनेक कारणांसोबत कसा परस्परांशी संबंधीत आहे हे पूढील स्पष्ट केले.

तृष्णेच्या कारणाने दुःख उत्पन्न होते. तृष्णा नसेल तर दुःख उत्पन्न होणार नाही.
तृष्णेच्या निरोधाने दुःखाचा निरोध होतो.
हयाच्यामुळे होण्यामुळे हे उत्पन्न होत असते.
हयाच्या न होण्यामुळे हे उत्पन्न होत नसते.

आशा तऱ्हेणे हया प्रतित्यसमुत्पाद अर्थात कार्यकारण भावाचा परस्पर संबंध विषद केला आहे.

बुद्ध तत्वज्ञानात प्रतित्यसमुत्पाद सिद्धांत मानवाच्या कार्याक वाचीक व मानसिक कर्माचा कर्म सिद्धांतास सुविख्यात प्रकाशित करण्यात आले. मानवास आपल्या स्वतःच्या कर्मास आपण स्वतःच कसे जबाबदार असतो हे मानव समाजास पटवून देण्यास तथागतांचा प्रतित्यसमुत्पाद हा सिद्धाउंत उपयोगी ठरला. बुद्ध तत्वज्ञानात ईश्वराचे आणि आत्म्याचे अस्तित्व मानले जात नाही. ब्रम्हा हे जगाच्या उत्पतीचे कारण कधीच स्विकारल्या जात नाही. प्रतित्यसमुत्पाद सिद्धांताच्या कार्यकारण भावाचा आधार घेत आपल्या भोवतालच्या सर्व वस्तू कारणांमुळे अस्तित्वात आल्या आहेत. अस्तित्वात आलेल्या सर्व नैसर्गिक घटना कारणाशिवाय अस्तित्वात आल्या नाहीत.

आपल्या कर्माचा करता करविता निसर्गातील अन्य कोणती शक्ती नसून त्या चांगल्या किंवा वाईट, कुशल वा अकुशल कर्मास मानुस म्हणून आपणच जबाबदार असतो.

आपल्याकडून घडलेल्या कर्माचे फ ळ हे सुद्धा आपणासच भोगावे लागते. मानवी कर्मास नशिब, दैव, भगवान, परमात्मा, आत्मा असे कोणीही जबाबदार नाही. आज नाही तर उद्या आपले कर्म त्यांच्या कुशल किंवा अकुशल स्वरूपाने फळ देतात जसे,

मनो पुब्बङ्गमा धम्मा मनो सेट्ठा मनो मया।
मनसाचे परसन्नेन, भासति वा करोतिवा।
ततो नं सुखमन्वेति, छाया 'व' अनपयिनि।।

अर्थः

''मनच हे सर्व प्रवृत्तीचे अग्रणी आहे;''
प्रमुख आहे सर्व काही मनातुन उत्पन्न
होते. जर प्रसन्न (शुद्ध) चित्ताने
(मनाने) बोलतो अथवा कर्म करतो.
तेव्हा सुख त्या व्यक्तिची कधीच
साथ सोडत नाही., ज्या प्रमाणे आपली
छाया (सावली) आपली साथ
केव्हाही साथ सोडून जात नाही.

तथागत भगवान बुद्धांनी प्रतित्यसमुत्पाद सिद्धांताच्या द्वारा सर्व संसारातील मानव जातीस समस्त दुःखातुन मुक्त होण्यासाठी आपण आपल्या वर्तमान परिस्थितीस आपणच जबाबदार आहोत असे प्रत्यक्ष कर्म अस्तित्व स्वरूप व्यक्त केले. आपल्या काया-वाचा आणि मनातून आपल्याद्वारा घडलेल्या कर्माचे फळ हे आपणासच प्राप्त होते. जगाच्या पाठीवर मानवास व त्याच्या कर्मास पूर्ण स्वातंत्र्य देणाऱ्या तत्वज्ञानाचा उपदेश तथागत बुद्धांनी दिला.

वरील विवेचनावरून सुक्ष वाचक म्हणून आपल्या लक्षात आले असेल की, कोणत्याही मानव सत्वाकडून ज्या कर्मक्रिया घडतात, त्याचा दूसरा कोणी कर्ता नाही. आत्मा, परमात्मा, ईश्वर, दैव देव, भूत, पिशच्च इ. अनैसर्गिक व कोणतेही अस्तित्व नसलेल्या बाबी कर्मास जबाबदार नाहीत.

### *4) प्रतित्यसमुत्पादाचे बारा अंगः*

बौद्ध तत्वज्ञानाचा मुळ सिद्धांत स्वरूपात प्रतित्यसमुत्पाद सिद्धांताची बारा अंगासह रचना (मांडणी) करण्यात आली आहे.

१) अविद्या
२) संखारा
३) विज्ञान
४) नामरूप
५) षड़ायतन
६) फस्स (स्पर्श)
७) वेदना

८) तण्हा (तृष्णा)
९) उपादान
१०) भव
११) जाति
१२) जरा - मरण

वरील एकून १२ अंगाच्या सहाय्याने प्रतित्यसमुत्पाद सिद्धांताची मांडणी बुद्ध तत्वज्ञानात करण्यात आली आहे.

वरील प्रतित्य समुत्पादाच्या प्रत्येक अंगास स्पष्टीकरणासह समजून घेण्याचा प्रयत्न करूया.

***1) अविद्याः*** प्रथमतः आपण समजून घेवूया की, अविद्या म्हणजे काय? अविद्या म्हणजे अज्ञान परंतू हे अज्ञान कशाप्रती निसर्गातील उपलब्ध असलेल्या ज्ञानाप्रति अज्ञान आहे. म्हणजे तो अविद्येत आहे का? तर, नाही बुद्ध तत्वज्ञानाचा आधार घेवून याचे उत्तर घ्यायचे झाल्यास अविद्या म्हणजे ज्यांना चार आर्य सत्याचे ज्ञान नाही म्हणजे तो अविद्येत आहे.

ज्याला दुःख म्हणजे काय? हे चार आर्यसत्याचे पहिले आर्यसत्य जर माहीत नसेल तर त्यांस दुसरे आर्यसत्य म्हणजे 'दुःख समुदाय' हे सुद्धा माहीत नसणार.

तिसरे आर्यसत्य म्हणजे 'दुःख निरोध' दुःख आणि दुःखाच्या कारणांचा अभ्यासे झाला असता त्या कारणांना नष्ट करता येणारा विश्वास तिसरे आर्यसत्य मानवात उत्पन्न करते. चौथे आर्यसत्य म्हणजे 'दुःख निरोध गामिनी प्रतिपदा' भगवान बुद्ध म्हणतात चौथे आर्यसत्य हे मानवास उत्पन्न होणाऱ्या सर्व दुःखातून मुक्त होण्याचा मार्ग दाखविते.

वरील चार आर्यसत्याचे ज्ञान असणे म्हणजेच अविद्येचा नाष होय.

***2) संखाराः***

पहिल्या प्रतित्यसमुत्पादाच्या अविद्या अंगामुळे मानवांच्या संस्कारांचा जन्म होतो. अविद्येमुळे तिन प्रकारचे संखारा उत्पन्न होतात.

१) काया संखारो
२) वाचा संखारो
३) चित्त (मन) संखारो

***3) विज्ञानः***

विज्ञान म्हणजे 'ज्ञान' आपल्या आयुष्याच्या प्रवासात निरनिराळया प्रकारे अनुभूती घेणे. सहा प्रकारच्या षड़ायतनातून अर्थात चक्षू विज्ञान कर्ण विज्ञान, घ्राण विज्ञान, जिव्हा विज्ञान, स्पर्श (काया) विज्ञान आणि मनो विज्ञान. या षड़ायतनातून दो नप्रकारचे विज्ञान जन्मास येते एक कुशल विज्ञान व अकुशल विज्ञान.

संखारांमुळे विज्ञान कसे जन्मास येते? विज्ञान आणि पित्ताचा प्रत्यक्ष असा संबंध आहे. संखारास उत्पन्न झालेल्यो वेदनेस नांव देण्याचे काम विज्ञान करते. वेदना हयांची विज्ञानामुळे जानीव होते.

***4) नाम – रूप :***

नाम - रूप म्हणजे पंचस्कंध मानवाचे विज्ञान नामरूपास म्हणजेच पंचस्कंधास जन्म देते. म्हणजेच रूप, वेदना, संज्ञा, संस्कार आणि विज्ञान. पाचस्कंधा बरोबर चार महाभूत उदा. पृथ्वी आप - तेज - वायू.

***5) षडायतन :***

षड़ायतन म्हणजे डोळे, कान, नाक, जीभ, शरीर (काया) आणि चित्त (मन) नाम - रूपाच्या प्रभावाने गर्भ वाढण्याच्या स्थित्यंतरात षड़ायतनाची इंद्रिये निर्माण होत असतात.

***6) फस्स (स्पर्श):***

फस्स म्हणजे स्पर्श किंवा स्पर्श करण्याची कर्म. जेव्हां चक्षु रूप आणि चक्षु विज्ञानर यांचा संबंध येतो तेव्हा त्या संबंधाला 'स्पर्श' असे म्हणता. स्पर्श म्हणजे ज्ञानेंद्रिय, ज्ञानेंद्रिय विषय आणि ज्ञानेंद्रिय विज्ञान यांचा समन्वय होते. षड़ायतनाच्या होण्यामूळे स्पर्श जन्मास येतो.

***7) वेदनाः***

वेदना म्हणजे इंद्रियांचा इंद्रिय विषयांशी संपर्क (सहवास) झाला असता जानवणारी अनुभूती. वेदना हया तीन प्रकारच्या असतात.

१) सुखद वेदना
२) दुःखद वेदना
३) असुखद - अदुःखद वेदना

स्पर्शातून वेदना जन्मास येते. षड़ायतन इंद्रियाशी झालेला स्पर्श त्या-त्या प्रकारच्या वेदनांची मानवाच्या विज्ञानास अनुभूती

करून देते.

### *8) तन्हा – (तृष्णा):*

स्पर्शातून वेदना आणि वेदनेतून तन्हा (तृष्णा) जन्मास येते. तृष्णा ही लोभ व आसक्ती या विकारांणी युक्त असते. प्रत्येक षड़ायतनाचा प्रत्येक विषय व त्या प्रत्येक विषयाप्रती नवीन तृष्णा ही जन्मास येते. तृष्णा तीन प्रकारची असते.

१) काम तृष्णा
२) भव तृष्णा
३) विभव तृष्णा

### *9) उपादान:*

उपादान आसक्त होणे. घट्ट धरून ठेवणे. उत्पन्न झालेल्या तृष्णेस सुख आहे असे मानून त्या तृष्णेत रममाण होणे. तृष्णेतून दुःख उत्पन्न होत असले तरीही ते सुखच आहे असे मानुन त्यात जगणे म्हणजे उपादान. उपादान चार प्रकारचे आहेत.

१) काम उपादान
२) दृष्टी उपादान
३) सिलबत्त उपादान
४) सत्काय दिट्ठी उपादान

तृष्णेच्या असण्याने उपादानाचा जन्म होतो.

### *10) भव :*

भव म्हणजे अस्तित्वात येणे किंवा स्वत्व वा आत्मभाव. भवाचे दोन पैलू आहेत

१) कम्म भव (कर्म)
२) विपाक भव (परिणाम)

कम्म (कर्म) प्रामुख्याने तीन प्रकारचे आहेत

१) कायीक
२) वाचीक
३) मानसिक

कर्माच्या विपाकामुळे उपपत्तीभव (जीवनकृम) तयार होतो. उपादानाच्या असण्याने भव (जन्म) अस्तित्व तयार होते.

### *11) जाति:*

भवाच्या प्रत्ययामुळे जन्म होत असतो. जातिचा अर्थ पंचस्कंधाचे प्रकट होणे, रूप, वेदना, संज्ञा, संस्कार आणि विज्ञान. यांचे प्रकट होणे सत्वाचा जन्म होणे. भवाच्या असण्याने जाति उत्पन्न होते.

### *12) जरा – मरण :*

जरा– वृद्धत्व – हे दोब भागात विभागले आहे. एक – नाम जरा व दुसरे रूप जरा. वृद्धत्वाचे स्वरूप हे क्षणिक व दीर्घकाळ सुद्धा असु शकते.

जन्म, जरा, मरण हे जीवनातील सर्वात महत्वाचे घटक आहेत. जातिच्या होण्याने जरा – मरण उत्पन्न होते. अशाप्रकारे १२ कडयांच्या सहाय्याने भगवान बुद्धांनी प्रतित्यसमुत्पाद या बौद्ध तत्वज्ञानातील मुळ सिद्धांताचे विवरण केले आहे.

### *7) सारांश:*

‘ प्रतित्यसुत्पाद ’ हा बौद्ध तत्वज्ञानातील सिद्धांत पैंकी प्रमुख व दीर्घज्ञानी मूळ सिद्धांत आहे. ‘धम्मच्चक्कप्पक्तनाय’ सुत्ताच्या उपदेशात भगवान बुद्धांनी संपूर्ण बुद्ध तत्वज्ञान हे प्रतित्यसमुत्पाद सिद्धांताच्या मूळ सिद्धांत सामावलेले आहे हे प्रतिवादीत केले.

वैशाख पौर्णिमेच्या रात्री ‘ बुद्धत्वाचा ’ साक्षात्कार झाल्यानंतर प्राप्त झालेल्या बुद्ध ज्ञानास तपासून पाहण्यासाठी बुद्धांनी ‘ अनुलोम ’ व प्रतिलोम पद्धतीने प्रतित्य समुत्पादाचे परिक्षण केले. प्रतित्य समुत्वादाचे अनुलोम व प्रतिलोम परिक्षण म्हणजेच चढत्या क्रमाणे १२ वेळा व उतरत्या क्रमाणे १२ असे सर्व प्रतित्यसमुदांच्या १२ अंगास २४ वेळा तपासून पाहणे.

प्रतित्यसमुत्पादाच्या तत्वज्ञानात बुद्धांनी जन्माची कारणे व जन्मानंतरचा प्रवास, असा एकून १२ अंगाचा कार्यकारणभाव स्पष्ट केला आहे. निसर्गात अचानक व आपोआप कारणाशिवाय असे कोणतेच कार्य होत नाही. निसर्गातल्या प्रत्येक घटनेमागे काही तरी कारण आहे. प्रतित्य समुत्पाद सिद्धांत मानवाच्या जिवनात उत्पन्न होणाऱ्या दुःखाचा मूळ स्त्रोत काय आहे?

मानवी दुःखाचे प्रथम व प्रमुख कारण सांगतांना बुद्ध म्हणतात प्रतित्यसमुत्पाद सिद्धांताचे पहीले अंग अविद्या हेच मानवाच्या दुःखाचे मुख्य कारण आहे. अविद्येतून जन्म जन्मातून प्रवस, प्रवासातून प्राप्त झालेले दुःख. जन्माच्या कारणास नष्ट करा दुःख नष्ट होईल.

८) संदर्भः

१) मा. शं. मोरे, बुद्ध धम्माचे मूळ सिद्धांत, प्रकाशक, डॉ. अशोक गायकवाड, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, प्रकाशन वर्ष, १७/३/२००६, पृ.क्रं. ७-२६
२) भदन्त सिस्सवंस, अभिधम्म पिटक सार, प्रकाशक, सुगत प्रकाशन, नागपूर - १७, प्रकाशन वर्ष - १८/१/२०१० पृ. क्रं. ८७ - ८६.
३) डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, बुद्ध आणि त्यांचा धम्म, प्रकाशन, प्रदीप लतिकाबाई गायकवाड, नागपूर - १७, प्रकाशन वर्ष २/१०/२००६, पृ.क्रं. ३०६-३१४

*तळ टीपा:*

१) मा. शं. मोरे, बौद्ध धम्माचे मूळ सिद्धांत प्रकाशक डॉ. अशोक गायकवाड, कौशल्य प्रकाशन औरंगाबाद, प्रकाश वर्ष, २००६ पृ. क्रं.७
२) कित्ता, पृ.क्रं. ६
३) कित्ता, पृ.क्रं. ८
४) कित्ता, पृ.क्रं. ६
५) कित्ता, पृ.क्रं. १०
६) पी.बी. पिसाळ, धम्मपद, प्रकाशक पालि पाठ संस्था, मुंबई, प्रकाशन वर्ष, १२१२, पृ.क्रं. ३